डभडड१६००५७५४२००६

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २२.०३.२००६. |
| नोंदणी तारीख | : | २२.०३.२००६. |
| निकाल तारीख | : | ११.०९.२०२५. |
| कालावधी | : | **१९** वर्ष, **०५** महिना, **२०** दिवस. |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, ५० वे न्यायालय,**
**विक्रोळी, मुंबई, यांचे न्यायालय.**
**( पिठासीन अधिकारी जे. आर. मुलाणी. )**

**खटला क्रमांक : ९१/पी.डब्ल्यू./२००६.**
**निशाणी क्रमांक : ११२**

**महाराष्ट्र शासन मार्फत,**
पोलीस स्टेशन अधिकारी,
पंतनगर पोलीस स्टेशन, मुंबई. } **... फिर्यादी**

**.. विरुध्द ..**

**१. भारतीबाई हरिश्चंद्र जाधव .**
वय - ७० वर्षे, व्यवसाय : समाजसेविका,
राहणार- सरस्वती बिल्डींग ब्लॉक नं. २८५, रूम नं. ३ व ४, पंतनगर, घाटकोपर पुर्व, मुंबई. } **... आरोपी**

**२. श्रीधर किसन साळवे.**
वय - ६६ वर्षे, व्यवसाय : व्यापार,
राहणार- प्लॉट नं. २७४, इराणी चाळ, दामजी कंपाउंड, जवाहर रोड, घाटकोपर पुर्व, मुंबई - ७७. } **... आरोपी**

**३. वृजलाल कालीदास परमार.**
वय - ८१ वर्षे, व्यवसाय : वकिल,
राहणार- ४४, न्यु शिवम सत्यम सुंदरम को. ऑप.हौ.सो., ओडियन सिनेमा समोर, घाटकोपर पुर्व, मुंबई - ७५. } **... आरोपी**

**४. सुधा दत्तात्रय पोतकर.**
वय - ६८ वर्षे, व्यवसाय : नोकरी,
राहणार- ३/११, यादव मिश्रा चाळ, पश्चिम द्रुतगती महामार्ग, जोगेश्वरी पुर्व, मुंबई - ६०. } **... आरोपी**

**भारतीय दंड संहिता, १८६० चे अपराध कलम ४६५, ४६७, ४६८, ४२० सह कलम ३४ अंतर्गत गुन्ह्याचा खटला.**

-------------------------------------

सरकारी वकील : श्री. विक्रम पोमाजी राठोड.
आरोपींतर्फे विधीतज्ञ : श्री. एन. के. जगताप, श्री. वाय. के. सुदाडे, श्रीमती पारूल कारीया व श्री. एस. बी. लभाहाटे.

-------------------------------------

## न्यायनिर्णय

**(दिनांक ११ सप्टेंबर, २०२५ रोजी खुल्या न्यायालयात घोषीत.)**

**१.** अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे शिक्षाधीन कलम ४६५, ४६७, ४६८, ४२० सह कलम ३४ अन्वये खटला दाखल केला आहे.

**२.** सरकार पक्षाचे कथन थोडक्यात पुढील प्रमाणे :-

खटल्याची थोडक्यात हकीगत अशी की, दि. १६.०५.२००० रोजी पासून नालंदा को.ऑप.हौ.सो., प्लॉट नं. २७३,२७४, लकडीवाला चाळ, जवाहर रोड, घाटकोपर पुर्व मुंबई - ७७ या ठिकाणी आरोपी क्र. १ व २ यांनी संगनमताने फिर्यादी श्रीमती सत्यवती भास्कर मेस्त्री हिचे नावाने दि. १६.०५.२००० रोजी बनावट संमतीपत्र/प्रतिज्ञापत्र तयार करून आरोपी क्र. ३ व ४ यांनी फिर्यादी प्रत्यक्ष हजर नसतांना व तिस ओळखत नसतांना अनुक्रमे आयडेन्टीफाईड ॲडव्होकेट व विशेष महानगर न्यादंडाधिकारी म्हणुन सह्या करून प्रमाणित करून आरोपी क्र. १ व २ यांना मदत केली व सदरचे बनावट संमतीपत्र/प्रतिज्ञापत्र 'एन वॉर्ड' बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई कार्यालयास सादर करून एस.आर.ए. स्कीम मंजुर करून घेतली व बृहन्मुंबई महानगर पालिकेची फसवणुक केली. अश्या आशयाची फिर्याद प्राप्त झाल्यांनतर पोलिसांनी आरोपींचा तपास घेतला. तपासाअंती पोलिसांनी आरोपींविरुध्द दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले.

**३.** प्रस्तुत प्रकरणात या न्यायालयाने आरोपींविरुध्द दोषारोप निशाणी-१९ वर भारतीय दंड संहिता, १८६० चे अपराध कलम ४६५, ४६७, ४६८, ४२० सह कलम ३४

नुसार ठेवले. आरोपीने निशाणी-२० ते निशाणी-२३ नुसार गुन्हा नाकबुल केला आणि खटला सुनावणीची मागणी केली.

**४.** प्रस्तुत प्रकरणात सरकार पक्षातर्फे साक्षीदार तपासण्यात आले. आरोपींचा कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अंतर्गत निशाणी-१०३ ते निशाणी-१०६ वर जबाब नोंदविण्यात आला.

**५.** प्रस्तुत प्रकरणामध्ये सरकारी वकिल व आरोपींच्या वकिलांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला. सदर प्रकरणामध्ये वस्तुस्थिती व परिस्थितीनुसार खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले आहेत. सदर प्रत्येक मुद्यांवर माझा निष्कर्ष खालील दिलेल्या कारणांकरिता पुढीलप्रमाणे सादर करीत आहे.

| **क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | सरकारपक्षाने हे शाबित केले आहे काय की, आरोपींनी समान उद्देश साध्य करण्याकरीता, दि.१६.०५.२००० रोजी पासून नालंदा को. ऑप.हौ.सो., प्लॉट नं. २७३,२७४, लकडीवाला चाळ, जवाहर रोड, घाटकोपर पुर्व मुंबई - ७७ येथे फिर्यादीला नुकसान किंवा क्षती पोचवण्याच्या अगर कोणत्याही हक्क-मागणीस किंवा स्वत्वाधिकारास पुष्आरोपी क्र. १ व २ यांनी संगनमताने फिर्यादी श्रीमती सत्यवती भास्कर मेस्त्री हिचे नावाने दि. १६.०५.२००० रोजी बनावट संमतीपत्र/प्रतिज्ञापत्र तयार करून आरोपी क्र. ३ व ४ यांनी फिर्यादी प्रत्यक्ष हजर नसतांना व तिस ओळखत नसतांना अनुक्रमे आयडेन्टीफाईड ॲडव्होकेट व विशेष महानगर न्यादंडाधिकारी म्हणुन सह्या करून प्रमाणित करून आरोपी क्र. १ व २ यांना मदत केली व सदरचे बनावट संमतीपत्र/प्रतिज्ञापत्र 'एन वॉर्ड' बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई कार्यालयास सादर करून एस.आर.ए. स्कीम मंजुर करून घेतली व बृहन्मुंबई महानगर पालिकेची फसवणुक केली.टी देण्याच्या अगर फिर्यादीला तिच्या मालमत्तेचा कब्जा सोडून द्यावयास लावण्याच्या, अगर कोणतीही स्पष्ट किंवा उपलक्षित संविदा करण्याच्या उद्देशाने अथवा कपट करण्याच्या किंवा ते कपट करणे शक्य व्हावे या उद्देशाने बनावट समंतीपत्र/प्रतिज्ञापत्र खोटा दस्तएवज बनवला व सदर दस्ताचे बनावटी करण केले व त्याद्वारे भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४६५ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केलेला आहे ? | **..नकारार्थी.** |

**२.** उपरोक्त दिवशी, त्याच वेळी आणि त्याच ठिकाणी आरोपींनी समान उद्‌देश साध्य करण्याकरीता, दस्तऐवज म्हणजे फिर्यादीचे नावाने बनावट संमतीपत्र/प्रतिज्ञापत्र तयार करून फिर्यादी प्रत्यक्ष हजर नसतांना व तिस ओळखत नसतांना अनुक्रमे आयडेन्टीफाईड ॲडव्होकेट नालंदा को.ऑप.हौ.सो.व विशेष महानगर न्यादंडाधिकारी म्हणुन सह्या करून प्रमाणित करून सदरचे बनावट संमतीपत्र/प्रतिज्ञापत्र तयार केले व एखादा मुल्यवान रोखा व मुल्यवान रोखा बनवण्यासाठी किंवा हस्तांतरित करण्यासाठी, अगर मुल्यवान रोखा स्वीकारण्याचा किंवा सुपूर्त करण्याचा प्राधिकार द ेण्यासाठी बनावट कागदपत्रे तयार केले व त्याद्वारे भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४६७ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केलेला आहे ? ..**नकारार्थी.**

**३.** उपरोक्त दिवशी, त्याच वेळी आणि त्याच ठिकाणी आरोपींनी समान उद्‌देश साध्य करण्याकरीता, फिर्यादीला नुकसान किंवा क्षती पोचवण्याच्या अगर कोणत्याही हक्क-मागणीस किंवा स्वत्वाधिकारास पुष्टी देण्याच्या अगर कोणतीही स्पष्ट किंवा उपलक्षित संविदा करण्याच्या उद्‌देशाने अथवा कपट करण्याच्या किंवा ते कपट करणे शक्य व्हावे या उद्‌देशाने फिर्यादीचे नावाने बनावट संमतीपत्र/प्रतिज्ञापत्र तयार करून फिर्यादी प्रत्यक्ष हजर नसतांना व तिस ओळखत नसतांना अनुक्रमे आयडेन्टीफाईड ॲडव्होकेट व विशेष महानगर न्यादंडाधिकारी म्हणुन सह्या करून प्रमाणित करून सदरचे बनावट संमतीपत्र/प्रतिज्ञापत्र 'एन वॉर्ड' बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई कार्यालयास सादर करून एस.आर.ए. स्कीम मंजुर करून घेतली व अशाप्रकारे खोटे दस्तएवज किंवा खोटा इलेक्ट्रॉनिक अभिलेख किंवा दस्तऐवजाचा किंवा इलेक्ट्रॉनिक अभिलेखाचा काही भाग बनवला व बनावट दस्तऐवज किंवा इलेक्ट्रॉनिक अभिलेख ठकवणूक करण्यासाठी वापरला जावा या उद्‌देशाने आरोपींनी बनावटीकरण केले व त्याद्वारे भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४६८ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केलेला आहे ? ..**नकारार्थी.**

**४.** उपरोक्त दिवशी, त्याच वेळी आणि त्याच ठिकाणी आरोपींनी समान उद्‌देश साध्य करण्याकरीता, फिर्यादीची ठकवणुक केली आणि त्यायोगे आरोपी क्र. १ व २ यांनी संगनमताने फिर्यादी श्रीमती सत्यवती भास्कर मेस्त्री हिचे नावाने बनावट संमतीपत्र/प्रतिज्ञापत्र तयार करून आरोपी क्र. ३ व ४ यांनी फिर्यादी प्रत्यक्ष हजर नसतांना व तिस ओळखत नसतांना अनुक्रमे आयडेन्टीफाईड ॲडव्होकेट व विशेष महानगर न्यादंडाधिकारी म्हणुन सह्या करून प्रमाणित करून ..**नकारार्थी.**

आरोपी क्र. १ व २ यांना मदत केली व सदरचे बनावट संमतीपत्र/प्रतिज्ञापत्र 'एन वॉर्ड' बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई कार्यालयास सादर करुन एस.आर.ए. स्कीम मंजुर करुन घेतली व बृहन्मुंबई महानगर पालिकेची फसवणुक केली व अशाप्रकारे फिर्यादीची फसवणुक केली व त्याद्वारे ठकवणूक करुन भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४२० सह कलम ३४ अन्वये गुन्हा केलेला आहे ?

**५.** आदेश काय ? **अंतिम आदेशा प्रमाणे.**

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दे क्रमांक १ ते ५ ला उत्तर</u> :-**

**६.** सदर मुद्दा क्रमांक १ ते ४ मधील अपराधांसंदर्भातील पुरावा, वस्तुस्थिती व परिस्थिती एकच असल्याने सदर मुद्यांचे अवलोकनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व मुद्यांचे अवलोकन एकत्रीत केलेले आहे.

**७.** सरकारपक्षाने आरोपींवरील दोषारोप शाबित करण्यासाठी स्वतंत्र साक्षीदार क्र. १ समेश केदारनाथ यादव यांना निशाणी-९८ वर तपासले असून त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केलेले आहे की, सन १९९५ पासुन ते ऑफिस बॉयचे काम करतात व ते कोणत्याही आरोपींना ओळखत नाही व ते वकील श्री. विलास सावंत यांच्या कार्यालयात शिपाई म्हणुन काम करत होते व ते ऑफिसमध्ये टेबल पुसायचे काम करत होते व ते सोसायटीचे झोपडपट्टी धारकाचे संमतीपत्रावर आयडेंटिफाय ॲफिडेव्हीट तयार करीत नव्हते व त्यांनी स्पेशल एक्झीक्युटीव मॅजिस्ट्रेट कडुन सह्या घेतल्या नव्हत्या.

**८.** अशा प्रकारे वस्तुस्थिती व परिस्थितीचे अवलोकन केले असता सरकारपक्षाने दाखल केलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता व दोन्ही पक्षातर्फे झालेला सविस्तर युक्तिवाद विचारात घेता असे दिसून येते की, सरकार पक्षाने सदर साक्षीदार क्र१ समशेर यादव याच्या व्यतिरिक्त इतर कोणताही साक्षीदार तपासलेला नाही. तसेच फिर्यादी श्रीमती सत्यवती भास्कर मेस्त्री हि प्रकरणात दाखल केलेल्या मृत्यू

प्रमाणपत्रानुसार दि. ०९.०४.२०२१ रोजी मयत झालेली आहे. तसेच सरकारपक्षाच्या आरोपानुसार आरोपी क्र. १ व २ यांनी संगनमताने फिर्यादी श्रीमती सत्यवती भास्कर मेस्त्री हिचे नावाने दि. १६.०५.२००० रोजी बनावट संमतीपत्र/प्रतिज्ञापत्र तयार केले. परंतु सरकार पक्षाने मुळ वादातील बनावट संमतीपत्र किंवा प्रतिज्ञाप्रत्राचा दस्त दाखल करून शाबित केलेला नाही. तसेच फिर्यादीच्या सहीचे कोणत्या आरोपीने बनावटीकरण केले याबाबत हस्ताक्षर तज्ञाचा अहवाल दाखल केलेला नाही. त्यामुळे निश्चित कोणत्या आरोपीने व कोणत्या समंतीपत्र किंवा प्रतिज्ञापत्रावर सहीचे बनावटीकरण केले याबाबत सरकारपक्षास किंचितही शाबित करता आलेले नाही असे दिसुन येते. तसेच सरकार पक्षाच्या आरोपानुसार आरोपी क्र. ३ व ४ यांनी फिर्यादी प्रत्यक्ष हजर नसतांना व तीस ओळखत नसतांना अनुक्रमे आयडेन्टीफाईड ॲडव्होकेट व विशेष महानगर न्यादंडाधिकारी म्हणुन सह्या करून प्रमाणित केले. परंतु त्याबाबत सरकार पक्षाने वादातील मुळ समंतीपत्र/प्रतिज्ञापत्राचा दस्त दाखल न केल्याने सरकार पक्षास आरोपी क्र. ३ व ४ यांनी अप्रामाणितपणे किंवा कपटीपणाने सदरचा वादातील समंतीपत्र/प्रतिज्ञापत्राचा दस्त तयार केला व त्यावर विशेष महानगर दंडाधिकारी म्हणुन सहया करून, मुद्रांकित केले हे शाबित करता आलेले नाही असे स्पष्टपणे दिसुन येते.

९. तसेच सरकार पक्षाच्या आरोपानुसार सदरचे बनावट संमतीपत्र/प्रतिज्ञापत्र 'एन वॉर्ड' बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई कार्यालयात आरोपींनी सादर करून, एस. आर.ए. स्कीम मंजुर करून घेतली व बृहन्मुंबई महानगर पालिकेची फसवणुक केली. परंतु त्याबाबत सदर बाब शाबित करण्यासाठी सरकारपक्षाने बृहन्मुंबई महानगर पालिकेचा कोणताही अधिकारी तपासलेला नाही किंवा त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल करून शाबित केलेला नाही. याउलट, आरोपीतर्फे निशाणी-१०९ वर दिनांक ०२.०६. २०१६ रोजी एव्हरेस्ट फिनकॅप प्रा.लि. यांनी फिर्यादी सत्यवती भास्कर मेस्त्री हिच्या नावांने नालंदा एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्यादीत प्लॉट नं२७४ मधील लॉटरीच्या सोडतीनुसार पुर्नवसन इमारत क्र.१ मध्ये सदनिका क्रमांक ६०३ दोन चाव्यांसह वितरीत केल्याचे दिसुन येते. तसेच निशाणी-११० वरील दस्तानुसार प्राधिकृत अधिकारी

तथा सहकारी अधिकारी, श्रेणी-१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी सदर फिर्यादीस पुनर्वसन इमारत क्र.१ मधील सदनिका क्रमांक ६०३ वाटप करण्यात आल्याबाबत पुनर्वसन सदनिकेचे वाटपपत्र फिर्यादीच्या नावांने दिल्याचे दिसुन येते. तसेच निशाणी -१११ वर सदर सहकारी गृहनिर्माण संस्थेने फिर्यादीच्या नांवे सदनिका क्रमांक ६०३ बाबत भाग दाखला क्रमांक ५९, सभासद खाते क्र.५९, भाग संख्या ५ प्रत्येकी किमंत१०/- रूपये प्रमाणे एकुण ५०/- रूपये रक्कम आकारून व फिर्यादीकडुन भरून ६ ोवुन भाग दाखला प्रमाणपत्र फिर्यादीस दिल्याचे दिसुन येते.

**१०.** परंतु वर विवेचन केल्याप्रमाणे सरकार पक्षास आरोपी क्र.१ व २ यांनी संगणमत करून फिर्यादीच्या नावांने एस.आर.ए. स्किम मजुंरीसाठी बनावट समंतीपत्र/ प्रतिज्ञापत्र तयार केले ही बाब शंकेपलिकडे शाबित करता आलेली नाही. तसेच सरकार पक्षास आरोपी क्र.३ वृजलाल परमार यांनी फिर्यादी प्रत्यक्ष हजर नसतानां तिस ओळखत नसतांना वकील म्हणुन सही केल्याचे किंवा आरोपी क्र.४ सुधा पोतकर यांनी विशेष महानगर न्यायदंडाधिकारी म्हणुन सहया करून, फिर्यादीची ठकवणुक करण्यासाठी, वादातील मुल्यंवान दस्त समंतीपत्र/प्रतिज्ञापत्राचे बनावटीकरण केले किंवा खोटा दस्ताऐवज तयार केला ही बाब शंकेपलिकडे शाबित करता आलेली नाही. त्यामुळे सरकारपक्षास आरोपींनी समान उद्देशाच्या पुरर्सनार्थ भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४६५, ४६७, ४६८, ४२० सह कलम ३४ अन्वये अपराध केल्याचे शंकेपलिकडे शाबित करता आलेले नाही. त्यामुळे वरील सर्व कारणांसाठी मी मुद्दा क्र. ०१ ते ०४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत असून मुद्दा क्र. ०५ च्या उत्तरार्थ आरोपी निर्दोषमुक्त होण्यास पात्र असल्याने खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र.१ भारतीबाई हरिश्चंद्र जाधव, आरोपी क्र. २ श्रीधर किसन साळवे, आरोपी क्र. ३ वृजलाल कालीदास परमार व आरोपी क्र. ४ सुधा

दत्तात्रय पोतकर यांना भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४६५, ४६७, ४६८, ४२० सह कलम ३४ मधील अपराधांतून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) नुसार निर्दोष सोडून देण्यात येते.

२. आरोपींचे जमानती बंधपत्र व जामीनकदबा रद्द करण्यात येते.

३. आरोपींनी निकटतम अपील न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- चा वैयक्तिक व जामीनकदबा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ प्रमाणे द्यावा.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.

JAVED RAJJAK MULANI

Digitally signed by JAVED RAJJAK MULANI
Date: 2025.09.12 10:50:23 +0530

**( जे. आर. मुलाणी )**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
५० वे न्यायालय, विक्रोळी,
मुंबई.

**ठिकाण : विक्रोळी, मुंबई.**
**दिनांक : ११.०९.२०२५.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Mrs.Sanjana S.Sawant |
| Name of Court | : | 50th Judicial Magistrate First Class, Vikhroli, Mumbai. |
| Date of Decision | : | 11.09.2025 |
| Judgment signed by the P.O. on | : | 11.09.2025 |
| Judgment uploaded on | : | 11.09.2025 |